नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १२६ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




सोमवार, दि. ०६ एप्रिल २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# ३५ हजार कोटींची विकास कामे होणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : सिंहस्थ कुंभमेळा अविस्मरणीय करण्याची मुख्यमंत्र्यांची बैठकीत ग्वाही

**नाशिक : (स. गांवकरी)**

प्रभू श्रीराम यांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या नाशिक त्र्यंबकेश्वरमध्ये पुढील वर्षी होणारा सिंहस्थ कुंभमेळा हा भव्य दिव्य आणि अविस्मरणीय करण्यासाठी ३५ हजार कोटी रुपयांची विविध विकास कामे करण्यात येत आहेत. भाविकांना विविध सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन करण्यात आले असून या प्रक्रीयेत साधू- महतांचे मार्गदर्शन महत्वाचे आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. अखिल भारतीय संत समिती- राष्ट्रीय कार्य समितीच्या दोन दिवसीय बैठकीचा समारोप तपोवनातील श्री स्वामी नारायण मंदिर येथे झाला. त्यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. कार्यक्रमाला कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, अखिल भारतीय संत समिती अध्यक्ष अविचल देवाचार्यजी, महंत श्री ग्यान देवसिंग महाराज, अखिल भारतीय आखाडा परिषदेचे अध्यक्ष रविंद्रपुरी महाराज, संत निवृत्ती महाराज, रावसाहेब महाराज गोसावी, पुरुषोत्तम महाराज देहूकर, अशोक तिवारी, श्री यतिंद्रानंद गिरीजी महाराज, जनार्दनहरी महाराज, स्वामी संविदानंद सरस्वती, जितेंद्रानंद स्वामी, ब्रह्मेशनंद महाराज, राजेंद्र दास, महंत दुर्गादास महाराज, भक्तिचरणदास महाराज आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, भाविकांना गोदावरीच्या निर्मळ आणि प्रवाही पाण्यात स्नान करता यावे म्हणून उपाययोजना केल्या जात आहेत. त्र्यंबकेश्वर येथे गोदवारीचा प्रवाह बारमाही व्हावा यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. कुशावर्तासाठी जलशुद्धीकरण प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. त्र्यंबकेश्वर रस्ता, नाशिक परिक्रमा मार्ग, रेल्वे स्थानकावरील सुविधा, घाटांची संख्या आणि लांबी वाढविणे, जुन्या मंदिरांचे संवर्धन, मंदिराकडे जाणाऱ्या मार्गांचे रुंदीकरण, ओझर विमानतळाचे विस्तारीकरण आदी विकास कामे सुरू आहेत. साधूग्रामसाठी कायमस्वरूपी जमीन अधिग्रहणाचा निर्णय घेण्यात आला आहे. साधूग्राममध्ये आवश्यक सर्व पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.




ते पुढे म्हणाले, कुंभमेळ्याकरीता प्रयागराजच्या धर्तीवर नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरण स्थापन करण्यात आले आहे. कुंभमेळ्याच्या सूक्ष्म आणि नेटक्या नियोजनासाठी नाशिक येथील अधिकाऱ्यांच्या पथकाने प्रयागराजचा दौरा केला होता. मागील कुंभमेळ्याच्या तुलनेत यंदा दहा पट अधिक भाविक येण्याची शक्यता असून त्यादृष्टीने नियोजन करण्यात येत आहे. विकासकामे करतांना साधू, महंत आणि आखाड्यांकडून आलेल्या सूचनांचाही स्वीकार करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. कुंभमेळा भारतीय अध्यात्मिक संस्कृतीचा सर्वात मोठा सोहळा आहे. मन आणि आत्म्याच्या शुद्धीकरणाचा हा सोहळा आहे. विचारांच्या प्रदूषणाला दूर सारून भारतीय संस्कृतीला प्रवाहीत करण्याचे हे पर्व आहे.

> संत शक्ती ही सज्जनशक्ती असून साधू संतांनी भारतीय संस्कृती टिकवून ठेवल्याचे नमूद करून मुख्यमंत्री म्हणाले, जगातील अन्य संस्कृती नामशेष होत असताना भारतीय संस्कृती टिकून राहिली. या संस्कृतीने वाईट गोष्टींना दूर सारले. ही प्राचीन असण्यासोबत नित्यनूतनही आहे. हेच भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे. साधू संतांनी या प्रवाहातील वाईट बाबी बाजूल्या सारल्याने संस्कृतीची निरंतरता टिकून आहे. महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायानेदेखील अनेक आक्रमणांना सामोरे जात वारीची परंपरा टिकवून ठेवली. हीच परंपरा कुंभमेळ्यात प्रतिबिंबीत होते.

# 'टॉय कार'ने दिल्लीत स्फोट घडवण्याचा कट उधळला

## जैशच्या दोन दहशतवाद्यांना अटक, महाराष्ट्र एटीएस अन् दिल्ली पोलिसांची कारवाई

**मुंबई : (स. गांवकरी)**

देशाची राजधानी दिल्ली पुन्हा एकदा दहशतीने हादरवण्याचा 'जैश-ए-मोहम्मद' (JeM) या दहशतवादी संघटनेचा मोठा कट सुरक्षा यंत्रणांनी उधळून लावला आहे. महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथक (ATS) आणि दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने मुंबईतील कुर्ला आणि ठाणे जिल्ह्यातील खडवली परिसरात संयुक्त मोहीम राबवून दोन संशयित दहशतवाद्यांना अटक केली आहे. धक्कादायक बाब म्हणजे, हे दहशतवादी 'टॉय कार'चा (खेळण्यातील कार) वापर करून भीषण स्फोट घडवून आणण्याच्या तयारीत होते. गुप्तचर यंत्रणांकडून मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे, महाराष्ट्र एटीएस आणि दिल्ली स्पेशल सेलने रविवारी मध्यरात्री मुंबई आणि ठाणे जिल्ह्यात छापेमारी केली. मुंबईतील गजबजलेल्या कुर्ला परिसरातून एकाला, तर ठाणे जिल्ह्यातील खडवली येथून दुसऱ्या संशयिताला ताब्यात घेण्यात आले. या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, पोलिसांनी या भागातील सुरक्षा व्यवस्था कडक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी दोन जणांना बेड्या ठोकल्या आहेत. कामरान उर्फ सोनू उर्फ मोझे (मूळ नाव: मोसाब अहमद उर्फ कलाम) आणि बडा इमरान (मूळ नाव: मोहम्मद हमद कालरा) अशी दोघांची नावे आहेत. प्राथमिक चौकशीत हे दोन्ही आरोपी पाकिस्तानस्थित 'जैश-ए-मोहम्मद' या दहशतवादी संघटनेच्या थेट संपर्कात असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यांच्या ताब्यातून अनेक संवेदनशील कागदपत्रे, डिजिटल उपकरणे आणि आक्षेपार्ह साहित्य जप्त करण्यात आले आहे.



> तपासादरम्यान समोर आलेली सर्वात धक्कादायक माहिती म्हणजे स्फोट घडवण्यासाठी वापरण्यात येणारी युक्ती. हे आरोपी खेळण्यातील कारमध्ये (Toy Car) स्फोटके पेरून दिल्लीतील गर्दीच्या ठिकाणी रिमोट कंट्रोलच्या साहाय्याने स्फोट घडवण्याच्या तयारीत होते. सुरक्षा यंत्रणांची नजर चुकवण्यासाठी त्यांनी या अनोख्या मार्गाचा अवलंब करण्याचा कट रचला होता. मात्र, त्यापूर्वीच पोलिसांनी त्यांच्या मुसक्या आवळल्या.

## थोडक्यात...

### आव्हान : काँग्रेसचा उमेदवार ठरला

पुणे (स. गांवकरी) : राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाने रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी राजकीय हालचालींना वेग आला आहे. ही निवडणूक बिनविरोध करण्यासाठी महायुतीने केलेले प्रयत्न निष्फळ ठरले असून, काँग्रेसने या मतदारसंघात आपला उमेदवार रिंगणात उतरवला आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी आकाश विश्वनाथ मोरे यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले असून, आता बारामतीत सुनेत्रा पवार विरुद्ध आकाश मोरे असा थेट सामना रंगणार आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासाठी ही निवडणूक बिनविरोध व्हावी, यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने मोठी मोर्चेबांधणी केली होती. खुद्द सुनेत्रा पवार यांनी शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे आणि काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना फोन करून पाठिंब्याचे आवाहन केले होते. मात्र, 'लोकशाहीत निवडणुका लढवणे गरजेचे आहे' अशी भूमिका घेत काँग्रेसने आपला स्वतंत्र उमेदवार देण्याचा निर्णय कायम ठेवला. रविवारी उशिरा दिल्लीतून आकाश मोरे यांच्या उमेदवारीची अधिकृत घोषणा करण्यात आली.

### IPL मध्ये सीएसकेचा सलग तिसरा पराभव

पुणे (स. गांवकरी) : चेन्नई सुपर किंग्सला (CSK) आयपीएलमध्ये सलग तिसऱ्या पराभवाला सामोरे जावे लागले. चिन्नास्वामी स्टेडियमवर यजमान संघ रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने (RCB) त्यांना ४३ धावांनी पराभूत केले. रविवारी झालेल्या दुसऱ्या सामन्यात नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना आरसीबीने या हंगामातील आपली सर्वोत्तम धावसंख्या २५० धावा केल्या. सीएसकेला केवळ २०७ धावाच करता आल्या. आरसीबीकडून, टिम डेव्हिडने २५ चेंडूंमध्ये ८ षटकारांसह ७० धावा केल्या. कर्णधार रजत पाटीदारने ४८, फिल सॉल्टने ४६, विराट कोहलीने २८ आणि देवदत्त पडिक्कलने ५० धावा केल्या. भुवनेश्वर कुमारने ३ बळी घेतले. अभिनंदन सिंग, जेकब डफी आणि कृणाल पंड्या यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.

### तलावात पोहण्याचा मोह बेतला जीवावर

छ. संभाजीनगर (स. गांवकरी) : वाढत्या उन्हाचा तडाखा आणि रविवारची सुट्टी असा दुग्धशर्करा योग साधून हर्सूल तलावात पोहण्यासाठी गेलेल्या चार तरुणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. सुट्टीचा आनंद घेण्यासाठी गेलेल्या या तरुणांवर काळाने झडप घातल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# जैन समाज हिंदूच, अल्पसंख्याक दर्जा फेकून देण्याची वेळ

## मंत्री मंगलप्रभात लोढांचा थेट प्रहार, धार्मिक ध्रुवीकरणाच्या राजकारणावरही भाष्य

**मुंबई : (स. गांवकरी)**

राज्यातील सत्ताधारी बाकावरून पुन्हा एकदा 'हिंदू अस्मिते'चा हुंकार घुमला असून, यावेळी कॅबिनेट मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी जैन समाजाच्या अल्पसंख्याक दर्जावरच थेट प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. "जैन धर्म हा मूळ हिंदू संस्कृतीचाच अविभाज्य भाग आहे. मुघल, इंग्रज आणि त्यानंतर काँग्रेसने आपल्या 'फूट डालो आणि राज करो' या कुटिल नीतीने हिंदू समाजाचे तुकडे केले. आता ही गुलामगिरीची मानसिकता आणि अल्पसंख्याक दर्जा झुगारून मूळ प्रवाहात येण्याची वेळ आली आहे," अशा जळजळीत शब्दांत लोढा यांनी प्रशासकीय आणि राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे. दक्षिण भारताचे उदाहरण देत लोढा यांनी धक्कादायक वास्तव समोर ठेवले. एकेकाळी दक्षिण भारतात २२ ते २३ टक्क्यांच्या आसपास असणारा जैन समाज आज केवळ ३ टक्क्यांवर येऊन ठेपला आहे. ही केवळ आकडेवारी नसून एका मोठ्या राजकीय षड्यंत्राचा हा परिणाम असल्याचे त्यांनी ठामपणे मांडले. मुस्लीम समाजात अनेक जाती असूनही काँग्रेसने त्यांना संघटित ठेवले, मात्र हिंदू समाजाला जाती-धर्मांच्या कप्प्यात बंदिस्त करून कमकुवत केल्याचा आरोप त्यांनी केला. हा केवळ वैयक्तिक विचार नसून यावर समाजातील ज्येष्ठ मुनी आणि विचारवंतांशी चर्चा सुरू असल्याचे लोढा यांनी स्पष्ट केले. जर समाजात व्यापक सहमती निर्माण झाली, तर जैन समाजाला अल्पसंख्याक दर्जातून बाहेर काढण्यासाठी आवश्यक ती कायदेशीर प्रक्रिया राबवण्याचे सूतोवाचही त्यांनी दिले आहे. राम जन्मभूमी आंदोलनाप्रमाणेच आता पुन्हा एकदा 'आम्ही हिंदू' ही भावना प्रबळ करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. पत्रकारांशी संवाद साधताना लोढा यांचा सूर केवळ धार्मिक नव्हता, तर तो प्रस्थापित व्यवस्थेला जाब विचारणारा होता. "ज्या जैन समाजाने जगाला अहिंसा आणि मानवतेचा संदेश दिला, त्यांना हिंदू धर्मापासून वेगळे करणे हा सांस्कृतिक द्रोह आहे," असे सांगत त्यांनी डॉ. हेडगेवार यांच्या विचारांची प्रासंगिकता अधोरेखित केली. आता चेंडू जैन समाजाच्या आणि सरकारच्या कोर्टात असून, या विधानाचे पडसाद आगामी काळात उमटणार हे निश्चित आहे.



# या, चहा प्या आणि CDR कसा काढला ते पाहा

## अंजली दमानियांचे राऊत, अंधारेंना आमंत्रण : AI तंत्रज्ञानाचा वापर केल्याचा दावा

**मुंबई : (स. गांवकरी)**

भोंदू अशोक खरात प्रकरणावरून राज्यातील राजकारण चांगलेच तापले असून, आता या वादात 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'ची (AI) एन्ट्री झाली आहे. अशोक खरातचे कॉल डिटेल्स (CDR) सार्वजनिक केल्यानंतर वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी विरोधकांचे आरोप खोडून काढले आहेत. "सीडीआर कसा मिळवला याचे प्रात्यक्षिक मी माझ्या घरी करून दाखवते, उद्या सकाळी चहा प्यायला या," असे खुले निमंत्रण त्यांनी शिवसेना (ठाकरे गट) आणि राष्ट्रवादीच्या नेत्यांना दिले आहे.

अशोक खरात प्रकरणात अनेक राजकीय नेत्यांचे लागेबांधे असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. अंजली दमानिया यांनी खरातच्या सीडीआरचा हवाला देत काही नेत्यांची नावे घेतल्याने खळबळ उडाली होती. मात्र, तांत्रिकदृष्ट्या हा डेटा मिळवणे बेकायदेशीर असल्याचे सांगत विरोधकांनी दमानिया यांचा संबंध थेट मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयाशी जोडला होता. अंजली दमानिया यांनी खरातचे कॉल डिटेल्स शोधून काढल्यानंतर त्यांच्यावर भाजपशी संबंधित असल्याचा आरोप शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत आणि सुषमा अंधारे यांनी केला होता. या आरोपांना उत्तर देताना दमानिया यांनी ट्वीट करत संजय राऊत, सुषमा अंधारे आणि राष्ट्रवादीचे नेते शशिकांत शिंदे यांना उद्या सकाळी १० वाजता आपल्या घरी चहासाठी बोलावले आहे.



अंजली दमानिया यांनी आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले आहे की, "मी CDR दाखवते, तो माझ्याकडे कसा आला ते तुम्ही स्वतः पहा. मी Claude हे AI वापरून त्यावर नंबर कसे शोधले त्याचे प्रात्यक्षिक दाखवते, तो खरा कसा आहे हे मी कसे चेक केले तेही पाहा. इतकेच नाही तर तुम्ही जे जे नंबर सांगाल, ते तुमच्यासमोर शोधून, त्यात इनकमिंग, आऊटगोईंग आणि कॉल समरी कशी येते, ते तुम्ही पाहा."

"सुषमा अंधारे, संजय राऊत आणि शशिकांत शिंदे यांना आदरपूर्वक आमंत्रण आहे. मात्र, ह्यानंतर, खरात या विषयावर चर्चा करा आणि हो, मी ही माहिती द्यायला पोलिस महासंचालकांकडे वेळ मागितली आहे. ते उद्या भेटेल तर त्यांनाही माहिती देणार आहे," असेही अंजली दमानिया यांनी म्हटले आहे.

दुसरीकडे, खासगी व्यक्तीकडे कॉल डिटेल्स कसे आले, यावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कडक भूमिका घेतली आहे. "सीडीआर मिळवण्याचा अधिकार केवळ तपास यंत्रणांनाच असतो. कोणत्याही खासगी व्यक्तीला तो अधिकार नाही. त्यामुळे अंजली दमानिया यांच्याकडे हा डेटा कोठून आला, याची सखोल चौकशी केली जाईल," असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे. यावर प्रतिक्रिया देताना दमानिया यांनी सांगितले की, त्यांनी या संदर्भात माहिती देण्यासाठी पोलिस महासंचालकांची भेट मागितली आहे.

### दमानियांच्या उद्याच्या प्रत्याक्षिकाकडे लक्ष

दरम्यान, आता उद्या सकाळी अंजली दमानिया यांच्या घरी हे नेते चहासाठी जाणार का आणि 'Claude' एआयच्या माध्यमातून खरंच कॉल डिटेल्स काढता येतात का, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. अंजली दमानिया यांच्या दाव्यामुळे तंत्रज्ञान आणि गोपनीयता या विषयावरही नवी चर्चा सुरू झाली आहे.

### अशोक खरात प्रकरणात 'निनावी' पत्राने खळबळ

राज्यभरात गाजत असलेल्या भोंदू अशोक खरात प्रकरणात आता एका निनावी पत्राने खळबळ उडवून दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) नेत्या रूपाली ठोंबरे यांना बीडमधून पाठवण्यात आलेल्या या पत्रात थेट राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. या पत्रामुळे चाकणकर यांच्या भूमिकेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, राजकीय वर्तुळात वादाला तोंड फुटले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या निनावी पत्रात असा दावा करण्यात आला आहे की, रूपाली चाकणकर यांच्या आशीर्वादाने बीडमधील राष्ट्रवादीच्या एक महिला पदाधिकारी अशोक खरातकडे महिलांना घेऊन जात होत्या.

# सुनेत्रा पवार महाराष्ट्र खो-खोच्या अध्यक्षपदी

## राज्याच्या खो-खो इतिहासात पहिल्यांदाच महिला अध्यक्ष

**मुंबई : (स. गांवकरी)**

"खेळ बदलेल, दिशा बदलेल!" अशा उत्साहात महाराष्ट्र खो-खो विश्वात आज ऐतिहासिक क्षण घडला, जेव्हा उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड जाहीर झाली! खो-खो, कबड्डी, कुस्ती आणि मल्लखांबसारख्या परंपरागत खेळांमध्ये राज्य असोसिएशनच्या अध्यक्षपदी पहिल्यांदाच महिला विराजमान झाल्याने हा क्षण सुवर्णाक्षरांनी लिहिला जाणार आहे. सुनेत्रा अजित पवार यांची निवड ही केवळ पदभरती नसून, महाराष्ट्राच्या क्रीडा इतिहासातील मोठी झेप मानली जात आहे. यापूर्वी हॉकी आणि रायफल संघटनांमध्ये महिला अध्यक्ष होत्या; मात्र खो-खो क्षेत्रात अनेक वर्षांनी हा सन्मान महिलेला मिळाला आहे. अजितदादा पवार यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या या पदावर सुनेत्रांनी एकहाती बाजी मारत नवा अध्याय सुरू केला आहे.

५ एप्रिल रोजी श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी येथे पार पडलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत अध्यक्षपदासाठी निवडणूक अपेक्षित होती. मात्र, अध्यक्षपदासाठी एकच अर्ज आल्याने निवडणूक बिनविरोध झाली. निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. धीरज कोल्हे यांनी अधिकृत घोषणा करताच सभागृहात उत्साहाची लाट उसळली. या वेळी लोकेश्वरा (उपाध्यक्ष, भारतीय खो-खो महासंघ व कर्नाटक असोसिएशन) आणि प्रदीप खांडरे (महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन) निरीक्षक म्हणून उपस्थित होते. ॲड. धीरज कोल्हे यांनी निवडीची घोषणा करताच सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला आणि आनंदाचा जल्लोष पाहायला मिळाला. त्यानंतर सरचिटणीस डॉ. चंद्रजीत जाधव, खजिनदार ॲड. गोविंद शर्मा, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले तसेच इतर पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सुनेत्रा अजित पवार यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.





# ३९वा अखंड हरिनाम सप्ताह उत्साहात संपन्न!

## समाजभूषण नानजीभाई ठक्कर यांचे अध्यात्मिक मार्गदर्शन; ग्रामस्थांच्या नियोजनाचे सर्वत्र कौतुक!



राजगुरुनगर : (स. गांवकरी)

खेड तालुक्यातील वडगाव पाटोळे येथे समस्त ग्रामस्थांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला ३९ वा अखंड हरिनाम सप्ताह शुक्रवारी मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. २७ मार्च ते ३ एप्रिल या कालावधीत पार पडलेल्या या सप्ताहात विविध धार्मिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळाली. गावातील नागरिक, वारकरी संप्रदायातील भाविक, महिला मंडळे आणि तरुण वर्गाने उत्स्फूर्त सहभाग घेतल्याने संपूर्ण गाव भक्तिरसात न्हाऊन निघाले होते. सप्ताहाची सांगता 'चिंतन केसरी' ह.भ.प. भरत महाराज थोरात यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. त्यांच्या ओजस्वी कीर्तनाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. कीर्तनादरम्यान त्यांनी नामस्मरणाचे महत्त्व, संत परंपरेचा वारसा आणि समाजात आध्यात्मिकतेची गरज यावर प्रभावी विवेचन केले. कीर्तनानंतर भाविकांनी मोठ्या श्रद्धेने काल्याचे दर्शन घेतले.

या सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध समाजभूषण, उद्योगरत्न व दानशूर व्यक्तिमत्त्व शेठ नानजीभाई ठक्कर (ठाणावाला) उपस्थित होते. सप्ताहादरम्यान गेल्या दहा दिवसांपासून गावात भक्तीचा अखंड जागर सुरू होता. दररोज पहाटे काकड आरती, त्यानंतर श्री ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी धार्मिक वाचन, सायंकाळी हरिपाठ आणि रात्री नामवंत कीर्तनकारांची कीर्तने असा भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. दररोज कीर्तनानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले होते. सप्ताहादरम्यान वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ मंडळी, महिला भाविक तसेच युवकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. गावातील विविध मंडळांनी स्वयंसेवक म्हणून जबाबदाऱ्या सांभाळत कार्यक्रम सुरळीत पार पाडला. संपूर्ण सप्ताहात शिस्तबद्ध नियोजन, स्वच्छता व्यवस्था, भाविकांसाठी बसण्याची सोय तसेच महाप्रसादाचे सुयोग्य नियोजन करण्यात आले होते.

काल्याच्या कीर्तनानंतर शेठ नानजीभाई ठक्कर यांनी उपस्थित जनसमुदायाला आशीर्वादरूपी मार्गदर्शन केले. "सप्ताह हा केवळ परंपरा म्हणून साजरा करण्याचा कार्यक्रम नसून चंचल मन, शरीर आणि बुद्धी ताब्यात ठेवण्यासाठी अध्यात्माची नितांत गरज आहे," असे त्यांनी सांगितले. सध्याच्या सामाजिक परिस्थितीत समाजाला योग्य दिशा देण्यासाठी धर्म आणि शास्त्राचा अभ्यास आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. "शस्त्रापेक्षा शास्त्र अधिक प्रभावी आहे," असे सांगत त्यांनी समाजात दानशूरपणाचे महत्त्वही स्पष्ट केले. मानवी कल्याणासाठी प्रत्येकाने आपल्या क्षमतेनुसार योगदान देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. या संपूर्ण सप्ताहाचे आणि विशेष मार्गदर्शनाचे उत्तम नियोजन केल्याबद्दल ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते विठ्ठलराव वरुडे पाटील यांचे ग्रामस्थांनी विशेष आभार मानले. त्यांच्या पुढाकारामुळे यंदाचा ३९ वा अखंड हरिनाम सप्ताह अधिक भव्य आणि ऐतिहासिक ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. सप्ताहादरम्यान गावात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये एकोपा व भक्तीभाव वृद्धिंगत झाल्याचे दिसून आले.

सप्ताह व यात्रा कमिटीमध्ये खजिनदार म्हणून नवनाथ पाटोळे यांनी जबाबदारी सांभाळली, तर अध्यक्ष म्हणून महेश पाटोळे आणि शंकर वरुडे यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यांच्या नेतृत्वाखाली सर्व ग्रामस्थांनी एकत्रितपणे कार्यक्रम यशस्वी केला.

## थोडक्यात पण महत्वाचे




### राष्ट्रीय स्पर्धेत दिवा शहरातील विद्यार्थी चमकले


ठाणे (स. गांवकरी) : दिवा शहरातील ओमकार क्लासेस च्या विद्यार्थ्यांनी नाशिक येथे झालेल्या National Maths Marathon 2026 या स्पर्धेत महाराष्ट्रातून मेरिटमध्ये स्थान मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांच्या या उज्वल यशाबद्दल त्यांचा सत्कार सोहळा दिवा शहरात आयोजित करण्यात आला होता. नाशिक येथील ब्रेन ट्रेन एज्युकेशन संस्थेतर्फे ही स्पर्धा संपन्न झाली असून दिवा शहरात विद्यार्थ्यांना अँबॅकस आणि जॉली फोनिक्स चे शिक्षण देणाऱ्या ओमकार क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन करून दिवा शहराचे नाव उंचावले आहे. दिवा शहरात अँबॅकस आणि जॉली फोनिक्स चे शिक्षण देणारे ओमकार क्लासेस हे पहिलं आणि एकमेव क्लासेस आहे. या सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा दिवा शहरातील शिवम बँक्वेट हॉल येथे संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक अँड आदेश भगत, नगरसेविका स्नेहा पाटील, हॅलो किड्सच्या संचालिका श्वेता पाशवे, श्री क्लासेसचे प्रवीण तिळवे आदी उपस्थित होते. ओमकार क्लासेसच्या संचालिका अर्चना पाटोळे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.



### ठाणे सिव्हिल रुग्णालयात उडाला स्वच्छतेचा बोजवारा

ठाणे (स. गांवकरी) : ठाणे सिव्हिल रुग्णालयात स्वच्छतेचा बोजवारा उडालेला पहावयास मिळाला प्रसंगी सोशल अक्टिविस्ट डॉ. बिनू वर्गीस यांनी रुग्णालयातील स्वछतेची पोलखोल उघड केल्यानंतरचा तात्काळ प्रशासनाकडून दखल घेण्यात आली. ठाणे जिल्हाधिकारी IAS श्रीकृष्ण पांचाळ यांनी मेंटल हॉस्पिटलजवळील जुने ठाणे सिव्हिल हॉस्पिटल येथे प्रत्यक्ष भेट देऊन सर्व वॉर्ड्सची सखोल पाहणी केली व रुग्णांशी संवाद साधला. बिनू वर्गिस यांच्या निदर्शनास आले की काही फायर एक्स्टिंग्विशर्सची वॉरंटी संपलेली होती तसेच त्यावर एक्सपायरी डेट नमूद नव्हती, तसेच ICU मधील AC देखील बंद अवस्थेत होता. रुग्णांनावर देखील अस्वच्छ परिस्थितीत उपचार सुरु होते यावर मा. जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सुधारणा करण्याचे निर्देश दिले. तसेच रुग्णालयातील अस्वच्छतेच्या बाबीही नोंदवून त्यावर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले. प्रसंगी वर्गिस यांनी तात्काळ कारवाई केल्याबद्दल मा. जिल्हाधिकाऱ्यांचे आभार मानले.

### माजी नगरसेवकासह सहकाऱ्यांच्या विरोधात पोलिस ठाण्यात तक्रार दाखल



ठाणे (स. गांवकरी) : बदलापूर शहरातील कात्रप तलाव येथे दिनांक ३१/०३/२०२६ रोजी अनोळखी मृतदेह आढळून आला असता. शिवसेना बदलापूर प्रवक्ते सुदाम घुगे यांनी बदलापूर नगर पालिकेकडे बंद पडलेले सीसीटीव्ही कॅमेरे चालू करणे आणि त्या ठिकाणी सिक्युरिटी गार्ड द्यावेत अशी मागणी केली असता. त्याचा राग मनात धरून विद्यमान नगरसेवकाचे वडील नरहरी कृष्णा पाटील आणि चुलते शरद कृष्णा पाटील, मयूर नरहरी पाटील, जगदीश बाळाराम पाटील इतर सहकाऱ्यांनी सुदाम घुगे यांना जीवे मारण्याची धमकी देऊन धक्का बुक्की केल्या प्रकरणी बदलापूर पोलिस ठाण्यात दिनांक ०२/०४/२०२६ रोजी नरहरी कृष्णा पाटील, शरद कृष्णा पाटील, मयूर नरहरी पाटील, जगदीश बाळाराम पाटील यांच्या विरोधात पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आला असून शिवसेना बदलापूर शहर प्रवक्ते सुदाम घुगे यांच्या जीवितास आरोपींच्या करून धोका असल्याचे सांगितले.

### 'एक कुटुंब, एक पद' या नियमाचे उल्लंघन; कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी

डांग, गुजरात (स. गांवकरी) : राज्याच्या शेवटच्या टोकाला असलेल्या डांग जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वीच भारतीय जनता पक्षात खळबळ उडाली आहे. जगातील सर्वात शिस्तबद्ध पक्ष म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भाजपमध्ये सध्या "एक कुटुंब, एक पद" हा नियम केवळ कागदावरच असल्याचे चित्र दिसून येत आहे. संघटनेतील महत्त्वाच्या पदांवर असलेल्या नेत्यांनी आणि त्यांच्या कुटुंबीयांनीच तालुका व जिल्हा पंचायत निवडणुकांसाठी उमेदवारी दाखल केल्यामुळे पक्षातील अंतर्गत विसंगती उघड झाली आहे, ज्यामुळे तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. डांग जिल्हा भाजपमध्ये सध्या "एक सांधला तर तेरा तुटतात" अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. पक्षाच्या जाहीर धोरणानुसार संघटनेतील पदाधिकाऱ्यांनी निवडणूक प्रक्रियेतून दूर राहणे अपेक्षित असते, परंतु येथे तर पदाधिकारीच तिकीटासाठी स्पर्धा करताना दिसत आहेत. या परिस्थितीमुळे पक्षाच्या विचारधारेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वर्षानुवर्षे पक्षासाठी कष्ट करणाऱ्या निष्ठावान कार्यकर्त्यांमध्ये अशी चर्चा सुरू झाली आहे की, "नियम फक्त सामान्य कार्यकर्त्यांसाठीच आहेत का?" या अंतर्गत वाद आणि गटबाजीमुळे आगामी निवडणुकांमध्ये भाजपला मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे, ज्याचा थेट फायदा काँग्रेसला होऊ शकतो. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे जिल्ह्यात पक्षात इतकी गोंधळाची स्थिती असतानाही जबाबदार नेते मौन बाळगून आहेत. वलसाड-डांगचे खासदार धवलभाई पटेल, आमदार विजयभाई पटेल, जिल्हाध्यक्ष किशोरभाई गवित आणि प्रभारी राजेशभाई देसाई हे संपूर्ण प्रकार फक्त पाहत असल्याचे चित्र दिसते. संघटनेतील पदाधिकाऱ्यांच्या कुटुंबीयांच्या उमेदवारीला आळा घालण्यात अपयशी ठरलेले हे नेतृत्व तळागाळातील कार्यकर्त्यांचा विश्वास गमावत आहे. जर भाजप हायकमांडने या प्रकरणात कठोर भूमिका घेतली नाही, तर शिस्त आणि संघटनेच्या नावाखाली दिल्या जाणाऱ्या घोषणा केवळ पोकळ ठरतील. आता पाहावे लागेल की प्रदेश नेतृत्व डांगमधील ही परिस्थिती नियंत्रणात आणते की "एक कुटुंब – एक पद" हा नियम कायमचा बाजूला सारला जातो.

## ॲसिड हल्ला पीडितेस शासन सर्वतोपरी मदत करणार

शिर्डी : (स. गांवकरी)

- महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे
- पीडित मुलीशी व तिच्या कुटुंबीयांशी आदिती तटकरे यांनी साधला संवाद

संगमनेर तालुक्यातील वडगावपान येथील ॲसिड हल्ल्यातील पीडित मुलीची महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे यांनी रविवारी लोणी येथील प्रवरा रुग्णालयात जाऊन भेट घेतली. या अत्यंत निंदनीय घटनेतील पीडित मुलीच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे आहे आणि तिच्या पुढील उपचारांचा संपूर्ण खर्च शासन करेल, अशी ग्वाही कु. तटकरे यांनी दिली. रुग्णालयात उपचार घेत असलेल्या या मुलीची प्रकृती सध्या स्थिर आहे. मात्र, तिचे वय लहान असून त्वचा संवेदनशील असल्याने तिला आणखी काही दिवस उपचारांची तसेच एका शस्त्रक्रियेची आवश्यकता आहे. डॉक्टर व प्रशासन तिची पूर्ण काळजी घेत आहेत. मुलीचे विशेष समुपदेशकाकडून समुपदेशन करण्यात आले असून, स्थानिक डॉक्टरांच्या मदतीने हे समुपदेशन पुढेही प्रभावीपणे सुरू ठेवण्याबाबत चर्चा झाली आहे. पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे, या उपचारांचा कोणताही आर्थिक भार पीडितेच्या कुटुंबावर पडू दिला जाणार नाही.

पीडितेस महिला व बालविकास विभागाच्या 'मनोधैर्य' योजनेअंतर्गत एक लाख रुपयांचे आर्थिक साहाय्य तात्काळ देण्यात येईल. यासोबतच, न्याय विभागाच्या 'व्हिक्टिम कॉम्पेन्सेशन स्कीम २०२२' अंतर्गत तिच्या कुटुंबाला तातडीची मदत म्हणून ३ लाख रुपये आधीच देण्यात आले आहेत.

## जामखेडच्या दोन ज्येष्ठ पत्रकारांना 'दै. गावकरी'चा राज्यस्तरीय टॉप टेन मानाचा पुरस्कार





शिर्डी : (स. गांवकरी)

दै. गावकरी समूहातर्फे दिला जाणारा महाराष्ट्र राज्यस्तरीय 'टॉप टेन' हा प्रतिष्ठेचा मानाचा पुरस्कार यंदा जामखेड येथील ज्येष्ठ पत्रकार दत्तात्रय राऊत आणि फायकभाई सय्यद यांना प्रदान करण्यात आला. शिर्डी येथे पार पडलेल्या भव्य समारंभात राज्यभरातील उत्कृष्ट वार्तांकन करणाऱ्या पत्रकारांचा गौरव करण्यात आला.

या पुरस्कारासाठी सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील उल्लेखनीय बातम्या प्रकाशित करणाऱ्या तसेच शोध पत्रकारितेत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पत्रकारांची निवड करण्यात येते. यावर्षी जामखेड तालुक्यातील दत्तात्रय राऊत आणि फायकभाई सय्यद या दोघांनीही त्यांच्या दीर्घकालीन व प्रभावी पत्रकारितेमुळे हा सन्मान पटकावला.

राऊत आणि सय्यद हे गेली तीन दशके पत्रकारितेच्या क्षेत्रात निष्ठेने कार्यरत आहेत. त्यांनी पत्रकारिता केवळ व्यवसाय म्हणून न पाहता, छंद आणि समाजसेवेचे प्रभावी माध्यम म्हणून स्वीकारले आहे. आजही ते त्याच तळमळीने समाजातील विविध प्रश्नांवर लेखणी चालवत आहेत.

या पुरस्काराचे वितरण दै. गावकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, उद्योजक नानजीभाई ठक्कर आणि कोकमठान संस्थानचे महंत परमानंदजी महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. या सोहळ्यास राज्यभरातील सुमारे दोनशे पत्रकार उपस्थित होते. दरम्यान, राऊत आणि सय्यद यांना हा मानाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल राजकीय, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात आले असून पुढील कार्यासाठी शुभेच्छाही देण्यात आल्या आहेत. जामखेड तालुक्याच्या पत्रकारितेच्या इतिहासात हा सन्मान 'दुग्धशर्करा योग' ठरत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

## दैनिक समर्थ गांवकरीचे नांदेड जिल्हा प्रतिनिधी अनिल पाटील धमने यांचा उत्कृष्ट टॉप टेन पत्रकारीता पुरस्काराने सन्मान




नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने संपादक, जिल्हा प्रतिनिधी व वार्ताहर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते या ठिकाणी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा विशेष सन्मान तसेच महाराष्ट्रातील उत्कृष्ट "टॉप टेन पत्रकारिता पुरस्कार" वितरण सोहळा दि ४ एप्रिल रोजी आत्मा मलिक ध्यानपीठ कोकमठाण ता कोपरगाव जिल्हा अहिल्यानगर येथे दै समर्थ गांवकरी चे नांदेड जिल्हा प्रतिनीधी अनिल पाटील धमने यांनी गेल्या १५ वर्षा पासून पत्रकारीता क्षेत्रात उलेखनिय कार्य करीत रोक ठोक लिखान करून अनेक विषयास वाचा फेडून अनेक सर्व सामान्य नागरिकांचे व रोजगार मजुरदार यांचे अनेक प्रश्न शासन दरबारी आपल्या बातमी च्या माध्यमातुन मांडून ते प्रश्न सोडवीत असतात दैनिकाच्या माध्यमांतुन सामाजीक राजकीय क्षेत्रात अपला वेगळा ठसा उमटविला असुन ते अनेकांना आपल्या बातमी मधून न्याय देण्याचे काम करीत आहेत त्यामुळे दैनिक गांवकरी समुहाच्या वतीने अनिल पाटील धमने यांना पत्रकारीता क्षेत्रातील उत्कृष्ट टॉप टेन २०२६ पुरस्कार सन्मान पत्र व सन्मानचिन्ह व शाल श्रीफळ पेन व मोठी घड्याळ देऊन दै समर्थ गांवकरी चे मुख्य संपादक डॉ विश्वासराव आरोटे . बिग बॉस फेम च्या दिव्या शिंदे . कार्यकारी संपादक नवनाथ जाधव. नवी मुंबई संपादक दशरथ चव्हाण. संजय फुलसुंदर. यांच्या सह मान्यवरांच्या उपस्थिती देण्यात आले. हा कार्यक्रम दि ४ एप्रिल २०२६ रोजी आत्मा मलिक ध्यानपीठ, समृद्धी महामार्ग शेजारी, कोकमठाण (ता. कोपरगाव) जिल्हा अहिल्यानगर येथे पार पडला आहे यावेळी दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने जीवन गौरव पुरस्कार-२०२६ संत परमानंद महाराज (आत्मा मलिक ध्यानपीठ, कोकमठाण) यांना प्रदान करण्यात आला आहे. तर उत्कृष्ट पत्रकारीता क्षेत्रातील महत्वाचे मानले जाणारे टॅप टेन २०२६ हा पुरस्कार दै समर्थ गांवकरी चे जिल्हा प्रतिनिधी अनिल पाटील धमने यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांना देण्यात आला या कार्यक्रमास महाराष्ट्रतुन सर्व जिल्ह्यातील समर्थ गांवकरी समुहाचे संपादक, उपसंपादक, जिल्हा प्रतिनिधी व वार्ताहरांचा सन्मान, व विविध साहित्य वितरण तसेच मार्गदर्शनपर सत्राचे आयोजन करण्यात आले होते. बिग बॉस फेम दिव्या शिंदे यांना "राज्यस्तरीय ज्ञानज्योती पुरस्कार २०२६, संतोष देविदास कोकणे यांना "समाजसेवा पुरस्कार २०२६, मा. वर्षाताई चौधरी (लहित, ता. अकोले, जि.अहिल्यानगर) यांना "उद्योजिका पुरस्कार २०२६" तसेच मा. सुनिलशेठ डांगरा (अकोले, जि. अहिल्यानगर) यांना "उद्योजक पुरस्कार - २०२६" प्रदान करण्यात येणार आहेत.

## सहा खेळाडूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड



इगतपुरी: (स. गांवकरी)

विल्होळी येथील स्वाभिमान बोट क्लबसाठी अभिमानाची बाब ठरली असून, क्लबमध्ये सराव करणाऱ्या सहा खेळाडूंची अखिल भारतीय विद्यापीठ नौकानयन अजिंक्यपद स्पर्धा 2026 साठी निवड झाली आहे. ही स्पर्धा सांगली (महाराष्ट्र) येथे होणार असून, खेळाडूंची निवड यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या वतीने करण्यात आली आहे. या उल्लेखनीय यशामागे राष्ट्रीय खेळाडू व प्रशिक्षक वैभव नवले व तुकाराम डांगे यांचे अथक परिश्रम, नियोजनबद्ध सराव आणि उत्कृष्ट मार्गदर्शन मोलाचे ठरले आहे. गेल्या पाच वर्षांपासून त्यांनी सातत्यपूर्ण मेहनतीतून खेळाडूंना घडवून राष्ट्रीय स्तरावर पोहोचवले आहे. अभिषेक भास्कर नवले, सुमित संजय थोरात, अभिषेक विष्णू थोरात, प्रतीक ज्ञानेश्वर कसबे, यश संतोष यादव आणि सुशांत शहाजी पाटील. या यशाबद्दल आमदार हिरामण खोसकर यांनी खेळाडू व प्रशिक्षकांचे विशेष अभिनंदन केले. यावेळी प्रतीक दादा गोवर्धने, अमोल चव्हाण, मनोज नवले व छगनराव सहाने उपस्थित होते.

## माओवादी खात्म्यावरून केंद्रावर काँग्रेसची जोरदार टीका

### 'श्रेयजीवी राजकारण थांबवा' – गोपाळदादा तिवारी



पुणे : (स. गांवकरी)

देशातील माओवादी/नक्षलवाद संपुष्टात आल्याच्या दाव्यावरून राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापले असून, या मुद्द्यावर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसने केंद्र सरकारवर तीव्र टीका केली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी नक्षलवादाच्या खात्म्याचे श्रेय सध्याच्या मोदी सरकारला देत केलेली वक्तव्ये "बालिश, अहंकारी आणि हास्यास्पद" असल्याचा आरोप काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी केला आहे. तिवारी यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात स्पष्ट केले की, देशातील नक्षलवादाविरुद्धचा लढा हा केवळ अलीकडच्या काळात सुरू झालेला नसून, तो पूर्वीच्या काँग्रेस सरकारांच्या काळापासून सातत्याने सुरू आहे. अनेक काँग्रेस नेत्यांनी नक्षलवाद्यांविरुद्ध लढताना आपले प्राण गमावले असून, या संघर्षाचे संपूर्ण श्रेय एका सरकारकडे वळवणे चुकीचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

गृह मंत्रालयाच्या आकडेवारीचा दाखला देत तिवारी म्हणाले की, २००४ ते २०१३ या कालावधीत २१६० नक्षलवादी ठार करण्यात आले, तर २०१४ ते २०२५ या कालावधीत हा आकडा २०८८ इतका आहे. यावरून काँग्रेस सरकारांच्या काळात नक्षलवादाविरुद्ध अधिक प्रभावी कारवाया झाल्याचे दिसून येते. त्यामुळे नक्षलवाद कमी होण्याचे श्रेय एकट्या भाजप सरकारला देता येणार नाही, तर त्यांनी युपीए सरकारच्या धोरणांचा पुढील टप्पा म्हणूनच वापर केला, असे त्यांनी सांगितले. नक्षलवादाच्या संघर्षात अनेक वरिष्ठ काँग्रेस नेत्यांनी प्राणांची आहुती दिल्याची आठवणही त्यांनी करून दिली. आंध्र प्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्रसह विविध राज्यांमध्ये माजी मंत्री, आमदार आणि नेत्यांवर झालेल्या हल्ल्यांमध्ये अनेकांचे निधन झाले. मात्र, त्या काळातील भाजप सरकारे त्यांचे संरक्षण करण्यात अपयशी ठरली आणि काही प्रकरणांमध्ये दोषींना शिक्षा देण्यातही अपयश आले, अशी टीका त्यांनी केली. तिवारी यांच्या मते, नक्षलवाद कमी होण्यामागे केवळ लष्करी कारवाया नव्हे, तर सामाजिक आणि विकासात्मक उपाय महत्त्वाचे ठरले. युपीए सरकारने आदिवासी भागात रस्ते, शाळा, आरोग्य सेवा, मोबाईल नेटवर्क आणि वीज पुरवठा यांसारख्या सुविधा उपलब्ध करून दिल्या. तसेच नक्षलवाद्यांना मिळणारी शस्त्रसामग्री आणि पुरवठा साखळी खंडित करण्यात आली.

काँग्रेसने आपल्या कारकिर्दीत आदिवासींच्या हक्कांसाठी महत्त्वाचे कायदे केले असल्याचा दावा करत त्यांनी वनहक्क कायदा (२००६), जमीन अधिग्रहण कायदा (२०१३) आणि ग्रामसभेला अधिकार देणाऱ्या सुधारणा यांचा उल्लेख केला. या उपाययोजनांमुळे आदिवासी समाजाला न्याय मिळाला आणि नक्षलवादाकडे त्यांचा ओढा कमी झाला, असे त्यांनी स्पष्ट केले.

#### भाजपवर गंभीर आरोप

याउलट, भाजप सरकारने आदिवासींचे हक्क कमी करून नैसर्गिक संसाधने कॉर्पोरेट क्षेत्राच्या हाती दिल्याचा आरोपही काँग्रेसने केला. सुरजागड, नियमगिरी, हसदेव अरण्य यांसारख्या प्रकल्पांचा उल्लेख करत, आदिवासींच्या विरोधाकडे दुर्लक्ष करून मोठे प्रकल्प राबवले जात असल्याचे त्यांनी म्हटले.

२०२५ पर्यंतही देशातील अनेक जिल्हे नक्षलग्रस्त असल्याचे सरकारी आकडे सांगत असताना "नक्षलवाद संपला" हा दावा वास्तवाशी विसंगत असल्याचे तिवारी यांनी नमूद केले. नक्षलवादाविरोधी कायदे अजूनही लागू केले जात असल्याने परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आली आहे, असे म्हणणे योग्य नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

# दैनिक समर्थ गांवकरीचा संपादक, जिल्हा प्रतिनिधी व वार्ताहर मेळावा उत्साहात संपन्न!

## मान्यवरांचा सन्मान; विविध पुरस्कारांचे वितरण; 'टॉप टेन पत्रकारिता' पुरस्कारांनी पत्रकारांचा गौरव!

**कोपरगाव : (स. गांवकरी)**

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने आयोजित संपादक, जिल्हा प्रतिनिधी व वार्ताहर मेळावा शुक्रवार, ४ एप्रिल २०२६ रोजी आत्मा मलिक ध्यानपीठ, समृद्धी महामार्ग शेजारी, कोकमठाण येथे उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा विशेष सन्मान करण्यात आला तसेच उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पत्रकारांना "टॉप टेन पत्रकारिता पुरस्कार" प्रदान करण्यात आले.



या प्रसंगी जीवन गौरव पुरस्कार – २०२६ संत परमानंद महाराज (आत्मा मलिक ध्यानपीठ, कोकमठाण) यांना प्रदान करण्यात आला. कार्यक्रमात संपादक, उपसंपादक, जिल्हा प्रतिनिधी व वार्ताहरांचा सत्कार करून त्यांना ओळखपत्र व विविध साहित्याचे वितरण करण्यात आले. तसेच आयोजित मार्गदर्शनपर सत्रात पत्रकारितेतील बदलते प्रवाह, सामाजिक जबाबदारी व डिजिटल माध्यमांचे महत्त्व यावर मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

यावेळी बिग बॉस फेम दिव्या शिंदे यांना "राज्यस्तरीय ज्ञानज्योती पुरस्कार – २०२६", मा. संतोष देविदास कोकणे यांना "समाजसेवा पुरस्कार – २०२६", मा. वर्षाताई चौधरी (लहित, ता. अकोले, जि. अहिल्यानगर) यांना "उद्योजिका पुरस्कार – २०२६" तसेच मा. सुनिलशेठ डांगरा (अकोले, जि. अहिल्यानगर) यांना "उद्योजक पुरस्कार – २०२६" प्रदान करण्यात आले. तसेच "टॉप टेन पत्रकारिता पुरस्कार" अंतर्गत मा. चंद्रकांत कोळी (रावेर, जि. जळगाव), मा. रविंद्र भोर (जुन्नर, जि. पुणे), मा. दत्तात्रय राऊत (जामखेड, जि. अहिल्यानगर), मा. राजेश डोके (शिवनेरी, ता. जुन्नर), मा. रविंद्र आहेर (कळवण, जि. नाशिक), मा. फयाक अली सय्यद (खर्डा, ता. जामखेड), मा. दशरथ चव्हाण (नवी मुंबई), मा. संतोष पडवळ (ठाणे), मा. अनिल धमने (नांदेड), मा. सुभाष विशे (शहापूर, जि. ठाणे) आणि पत्रकार राजू टपाल यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास बिग बॉस फेम दिव्या शिंदे (सरकार सेना संघटना अध्यक्ष व प्रसिद्ध इंस्टाग्राम इन्फ्लुएंसर), समूह संपादक, डॉ. विश्वासराव आरोटे (संपादक, दैनिक समर्थ गांवकरी), नवनाथ जाधव (कार्यकारी संपादक), दशरथ चव्हाण (संपादक व नवी मुंबई जिल्हाध्यक्ष, म.टा.प.संघ, मुंबई) तसेच संजय फुलसुंदर (व्यवस्थापक, दै. समर्थ गांवकरी) यांची प्रमुख उपस्थिती होती.

मेळाव्यास राज्यभरातील संपादक, प्रतिनिधी, वार्ताहर व पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन शिस्तबद्ध व प्रभावी पद्धतीने पार पडले असून उपस्थितांनी दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या उपक्रमाचे कौतुक केले.




















# शिवसेना युवानेते आकाश बाफना अपघातात जखमी

## रस्त्यावर गतीरोधक, दिशादर्शक फलक, रेडियम बसवावेत - शिवसेना युवानेते आकाश बाफना

जामखेड : (स. गांवकरी)

जामखेडचे युवा उद्योजक व शिवसेनेचे युवा नेते आकाश बाफना हे नगर रोडने जामखेड च्या दिशेने आपल्या चारचाकी इलेक्ट्रिक एम.जी. विंडसर गाडीने आपल्या भाच्याबरोबर येत असताना बाफना पेट्रोल पंपाकडे टर्न घेत असताना नगर रोडने येणाऱ्या काळ्या रंगाच्या स्कॉर्पीओ गाडीने आमच्या गाडीला जोराची धडक दिली व स्कॉर्पीओ गाडी भरघाव वेगाने निघून गेली यात आकाश बाफना हे किरकोळ जखमी



झाले. नगर जामखेड सिमेंट रस्ता झालेला आहे. रस्त्यावर गतीरोधक, दिशादर्शक फलक, रेडियम नसल्याने वाहनांचा वेग जास्त असतो यामुळे अपघात होतात ठेकेदारांने ताबडतोब या रस्त्यावर गतीरोधक टाकावेत, दिशादर्शक फलक लावावेत तसेच जागोजागी रेडियम बसवावेत अशी मागणी शिवसेना युवानेते व उद्योगपती आकाश बाफना यांनी जामखेड न्युजशी बोलताना केली आहे. आकाश बाफना यांनी जामखेड पोलीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दिनाक ३ एप्रिल रोजी सायंकाळी पावणेसातच्या सुमारस मी माझे बरोबर माझा भाचा नामे मित आमित चोपड़ा वय 16 वर्षे असे घरुन माझी एम.जी. विंडसर कंपनीची कार नंबर MH-16-DS-0823 ही मधुन नगर ते जामखेड रोड ने जामखेड कडे येत असताना मी बाफना पेट्रोल पंपाकडे टर्न घेत असताना नगर ते जामखेड रोडने एक स्कॉर्पीओ काळ्या रंगाची जीप ही भरधाव वेगात आली व मी टर्न घेत असताना सदर स्कॉर्पीओ गाडीने माझे ड्रायव्हर साईडला जोरीची धडक देवुन निघुन गेला.

माझे गाडीला धडक बसल्याने दोन एअरबॅग (Airbag) खुलल्या व मला कंबरेला व उजवे हातास मार लागला आहे.



डांग, गुजरात : मालेगाव घाटात ऊस भरलेली पिकअप गाडी पलटी; गंभीर अपघात प्राप्त माहितीनुसार, आज महाराष्ट्रातील वणी येथून ऊस भरून श्यामगहाणकडे जात असलेली पिकअप गाडी (क्रमांक: GJ-30-T-0517) डांग जिल्ह्यातील सापुतारा–श्यामगहाण राष्ट्रीय महामार्गावर मालेगावजवळ संतोकबा ढोलकिया विद्यालयाजवळ अपघातग्रस्त झाली.

## थोडक्यात बातम्या...



### रोटरी क्लबने फुलविला दिव्यांग बांधवांच्या जीवनात आनंद

■ १६२ दिव्यांगांची तपासणी, १०४ लाभार्थी निवड

संगमनेर (स. गांवकरी) : रोटरी क्लब ऑफ संगमनेर, रत्नानिधी फाऊंडेशन, मुंबई आणि रियांश मल्टिट्रेड लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग बांधव-भगिनींसाठी आयोजित करण्यात आलेला 'जयपूर फूट कॅम्प' हा सामाजिक उपक्रम दर्शन रोटरी आय केअर हॉस्पिटल येथे दिनांक १ व २ एप्रिल २०२६ रोजी उत्साहात पार पडला. या दोन दिवसीय कॅम्पमध्ये एकूण १६२ दिव्यांगांची मोफत तपासणी व मोजमाप करण्यात आले. त्यापैकी १०४ गरजू लाभार्थ्यांची निवड करण्यात आली असून, त्यांना लवकरच ११८ जयपूर फूट, कृत्रिम हात तसेच आवश्यकतेनुसार कुबड्यांचे विनामूल्य वितरण करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी रत्नानिधी फाऊंडेशन, मुंबईचे मनोज चव्हाण व त्यांची टीम, रियांश मल्टिट्रेड लिमिटेडचे प्रमुख श्री. मधुकरजी जाधव, संगमनेर नगरपालिकेचे मुख्याधिकारी श्री. दयानंदजी गोरे, रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे सहाय्यक प्रांतपाल रो. अमोल वैद्य, ओम मयूर ज्वेलर्सचे संचालक रो. महेश मयूर तसेच लाहोटी असोसिएट्सचे संचालक श्री. गणेशजी लाहोटी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी रोटरी क्लब ऑफ संगमनेरचे अध्यक्ष रो. विश्वनाथ मालाणी, सचिव रो. सौरभ म्हाळस, उपाध्यक्ष रो. महेश वाकचौरे, खजिनदार रो. संकेत काजळे, प्रकल्प समन्वयक रो. अजित काकडे, प्रकल्पप्रमुख रो. आनंद हासे, रो. महेश ढोले, रो. डॉ. प्रमोद राजुस्कर, रो. डॉ. सुजय कानवडे, रो. डॉ. किशोर पोखरकर यांच्यासह अनेक डॉक्टर, पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. तसेच रोटरी सदस्य, नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते आणि दर्शन रोटरी आय केअर हॉस्पिटलचे वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या उपक्रमाला संगमनेर नगरपालिकेच्या नगराध्यक्षा सौ. मैथिलीताई तांबे, इतर नगरसेवक तसेच रोटरी सेवागौरव पुरस्काराचे मानकरी चं. का. देशमुख सर, श्री. सिद्धार्थ तांगडकर यांसह विविध मान्यवरांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

### कुऱ्हाडीने हल्ला; वादाचे रूपांतर मारहाणीत; दोघांवर गुन्हा दाखल

अहिल्यानगर (स. गांवकरी) : भिंगारजवळील आलमगीर परिसरातील ब्रम्हनगर येथे जुन्या वादाच्या कारणावरून एका व्यक्तीवर कुऱ्हाडीने हल्ला केला केला. ही घटना १ एप्रिल रोजी घडली. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अशोक बन्सी गायकवाड (रा. देवकृपा कॉलनी, आलमीगर) यांनी पोलिसांत फिर्याद दिली. बुधवारी रात्रीच्या सुमारास आरोपी राजू कुऱ्हाडे आणि मयूर राजू कुऱ्हाडे हे संगनमत करून गायकवाड यांच्या घरासमोर आले. तुमच्यामुळे माझ्या मुलीला त्रास होतो, असा आरोप करत आरोपींनी वाद उकरून काढला. वादाचे रूपांतर शिवीगाळ आणि मारहाणीत झाले. यावेळी आरोपीने हातातील कुऱ्हाडीच्या तुंब्याने अशोक गायकवाड यांच्या पाठीवर मारहाण प्रहार केला. पतीला वाचवण्यासाठी त्यांची पत्नीमध्ये आली असता, आरोपींनी त्यांनाही लाथाबुक्क्यांनी अमानुष मारहाण करीत जीवे मारण्याची धमकी दिली, असे फिर्यादीत म्हटले आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक जगदीश मुलगीर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अंमलदार डी. पी. मोरे गुन्ह्याचा तपास करीत आहेत.

### धोलवड फाट्यावर अज्ञात वाहनाच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील ओतूर ओझर-नारायणगाव मार्गा वरील धोलवड फाट्याजवळ रविवारी दि:-५ एप्रिल सकाळी झालेल्या अपघातात एका तरुणाचा मृत्यू झाला,तर दुसरा गंभीर जखमी झाला आहेअज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत हा अपघात घडल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.मिळालेल्या माहितीनुसार, स्प्लेंडर क्र. MH 17 DA 3520 या दुचाकीवरून दोन युवक ओझरच्या दिशेने जात होते. सकाळी सुमारे ८:४५च्या सुमारा पाठीमागून भरधाव वेगाने आलेल्या अज्ञात वाहनानेदुचाकी ला जोरदार धडक दिली.धडक इतकी भीषण होती की दोघेही दुचाकीस्वार रस्त्यावर फेकले जाऊन गंभीर जखमी झाले. अपघातानंतर संबंधित धोलवड फाट्याजवळील 'हॉटेल कोकण पॅलेस' समोर ही हृदयद्रावक घटना घडली यावेळी अपघात ग्रस्त तरुणांना मदत करण्या ऐवजी धडक देणारे वाहन धारक पळून गेले असे प्रत्यक्ष दर्शींनी सांगितले. अपघाताचा आवाज ऐकून स्थानिक नागरिक व वाटसरूंनी तातडीने घटना स्थळी धाव घेत जखमींना सुरक्षित ठिकाणी हलवले आणि ॲम्ब्युलन्सच्या मदतीने जवळील रुग्णालयात दाखल केले. ओतूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांनी तपासणी केली असता सोपान यशवंता लांघी (वय २७,रा. मवेशी,ता:-अकोले,जि:- अहिल्यानगर यांना मृत घोषित करण्यात आले.दुसऱ्या जखमी वर आळेफाटा येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती चिंताजनक आहे.

# वघई पोलिसांनी वाहन चोरीचा गुन्हा उघडकीस आणला

## महाराष्ट्रातून चोरलेल्या दोन पिकअप व्हॅनसह दोघांना अटक

डांग, गुजरात : (स. गांवकरी)

डांग जिल्हा पोलिसांनी मालमत्तेसंबंधित गुन्हे रोखण्यासाठी सुरू केलेल्या मोहिमेत वाघई पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. वघई पोलिसांच्या पथकाने महाराष्ट्रातील वणी आणि सुरगाणा येथून चोरलेल्या दोन पिकअप व्हॅनसह दोन सराईत चोरांना पकडून एकूण ₹४.९५ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

वघई पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ए. ए. चावडा आणि त्यांची टीम वघई-आहवा रस्त्यावर वाहन तपासणी करत होते. त्यावेळी संशयास्पद पिकअप व्हॅन (क्रमांक: MH-15-EG-2850) थांबवून तपासणी केली असता चालकाकडे कोणतीही कागदपत्रे आढळली नाहीत. 'ई-गुजकॉप'मध्ये तपास



केल्यावर हे वाहन दुसऱ्या व्यक्तीच्या नावावर असल्याचे समोर आले.

कडक चौकशीत आरोपींनी कबूल केले की हे वाहन महाराष्ट्रातील वणी येथून चोरी केले होते. पुढील तपासात त्यांनी सुमारे दोन महिन्यांपूर्वी सुरगाणा येथील पेट्रोल पंपावरून आणखी एक पिकअप व्हॅन (MH-42-M-7630) चोरी केल्याची कबुली दिली, जी पोलिसांनी पिपलगाव येथून जप्त केली. मुख्य आरोपी चंद्रकांत जाधव याचे स्वतःचे पिकअप वाहन अपघातात पूर्णपणे खराब झाले होते. विमा न मिळाल्याने आणि दुरुस्तीचा खर्च सुमारे ₹४ लाख येत असल्यामुळे त्याने स्पेअर पार्ट्स बदलण्यासाठी आणि कर्जाचे हप्ते भरण्यासाठी वाहन चोरी करण्यास सुरुवात केली.

वघई पोलिसांनी चंद्रकांत बालूभाई जाधव (वय ३१, रा. सूर्यगड, सुरगाणा, जि. नाशिक) आणि मनोज संजय भोये (वय २३, रा. करंजली, सुरगाणा, जि. नाशिक) यांना अटक केली आहे. जप्त मुद्देमाल: पिकअप व्हॅन (MH-15-EG-2850) – ₹३,४०,००० पिकअप व्हॅन (MH-42-M-7630) – ₹१,४०,००० २ मोबाईल फोन – ₹१५,००० एकूण मुद्देमाल: ₹४,९५,००० सध्या पोलिसांनी आरोपींविरुद्ध पुढील कायदेशीर कारवाई सुरू केली आहे.

# 'भोंदू अशोक खरात प्रकरणाला नवे वळण'

■ अहिल्यागरमधील पतसंस्थेच्या बनावट खात्यांमधून ६० कोटींचे व्यवहार उघड

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

भोंदू अशोक खरातच्या काळ्या साम्राज्याची व्याप्ती दिवसागणिक वाढत आहे. पोलिस तपासात दररोज नवा ट्विस्ट समोर येत आहे. 'समता' पतसंस्थेतून कोट्यवधीचे व्यवहार झालेला खातेधारक नामकर्ण आवारे याची शिर्डी पोलिसांनी चौकशी केली. या चौकशीत त्याने 'ती' खाती आपली नसल्याचा दावा करतानाच खाते उघडण्यासाठी कधी गेलोच नाही, असा धक्कादायक जबाब पोलिसांना दिला. त्यामुळे आवारेचे खाते उघडतेवेळी अर्जावरील सह्या कोणी केल्या, केवायसी कशी केली गेली, व्यवहार कसे झाले, अशा अनेक प्रश्नांच्या उत्तरांसाठी 'समता'चे अध्यक्ष व व्यवस्थापनाची चौकशी होणार असल्याचे पोलिस प्रशासनाकडून समजले. शिर्डीतील जमीन व्यवहार प्रकरणात सिन्नरची जगदंबा आणि कोपरगावच्या समता पतसंस्थेची राहाता शाखा चर्चेत आली आहे. दोन्ही संस्थांमध्ये १३२ वेगवेगळ्या नावांनी खाती उघडण्यात आली. त्या सर्व खात्यांचा वारसदार अशोक खरातच आहे. याशिवाय त्याचाच मोबाईल नंबर या खात्यांना लिंक आहे. समता पतसंस्थेतून तब्बल ६० कोटींचे व्यवहार करण्यात आल्याचे पोलिस तपासात समोर आल्यानंतर हे व्यवहार पोलिसांच्या रडारवर आले आहेत. पोलिसांनी प्राथमिक तपासात खातेधारकांचे जबाब घेण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.



# प्रवचनाचा लाभ घेण्याची भक्तांना संधी

■ अहिल्यानगरमध्ये गोवत्स हभप राधाकृष्णजी महाराज व हभप भास्करगिरी महाराज संत-सद्गुरूंचे आगमन

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

शहरातील भक्तांसाठी आनंदाची बातमी असून संत आणि सद्गुरूंच्या दर्शनाचा व प्रवचनाचा लाभ घेण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. गुरुदत्त भक्तीधाम, संत किसनगिरीनगर मंदिर येथे रविवार दिनांक ५ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता , सद्गुरु भास्करगिरी महाराज तसेच परमपूज्य गोवत्स श्री राधाकृष्णजी महाराज (जोधपूर) यांचे आगमन होणार आहे.या पवित्र प्रसंगी दोन्ही महात्म्यांच्या दर्शनाचा दुग्धशर्करा योग लाभणार असून, परमपूज्य श्री राधाकृष्णजी महाराज यांच्या मधुर वाणीमधून भक्तांना प्रवचनाचा लाभही मिळणार आहे.

भक्ती, अध्यात्म आणि सत्संग यांचा संगम अनुभवण्याची ही दुर्मिळ संधी असल्याने परिसरातील भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. तरी सर्व भक्तांनी संत आणि सद्गुरूंच्या दर्शनासाठी व सत्संगासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री समर्थ सद्गुरु किसनगिरीबाबा नगर भक्तमंडळ व बन्सी महाराज मिठाईवाले यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# महात्मा फुले हे सर्व समाजाचे दैवत : बाळासाहेब मिसाळ

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

दीडशे वर्षांपूर्वी क्रांतीसुर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीआई फुले या दांपत्यांनी सर्व समाजाला शिक्षणाची द्वारे खुली केली. त्यांच्या कार्याला विरोध करणाऱ्यांनी वेळप्रसंगी शेण व चिखल मारले. तरीदेखील या महापुरुषांनी सर्वांना शिक्षण दिले.महिलांना चूल आणि मुल या सकल्पनेतून बाहेर काढले.

शिक्षणाने महिलांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त झाली.महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे भव्य दिव्य स्मारक होत असल्याने सर्व समाजाला आनंद होत आहे. माळीवाडा येथे क्रांतीसुर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीआई फुले पूर्णाकृती पुतळा होऊन भव्य दिव्य असे स्मारक व्हावे.ही सर्व समाजाची मागणी आहे.स्मारक भव्य दिव्य होण्यासाठी माळीवाडा वेस पाडण्यात यावी.यासाठी वीरशैव लिंगायत गवळी समाज जाहीर पाठिंबा देत आहे.महात्मा फुले हे सर्व समाजाचे दैवत आहे.असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब मिसाळ यांनी केले आहे.

महात्मा फुले दांपत्य स्मारक समितीच्या "माळीवाडा वेस पाडावी"या ठरावाला वीरशैव



■ महात्मा फुले व सावित्रीआई फुले यांचे स्मारक भव्य दिव्य होण्यासाठी "माळीवाडा वेस पाडावी" यासाठी वीरशैव लिंगायत गवळी समाजाचा जाहीर पाठिंबा

लिंगायत गवळी समाज ट्रस्ट ने जाहीर पाठिंबा दिला आहे.

यावेळी महात्मा फुले दांपत्य स्मारक समितीचे किशोर डागवाले,प्रा.माणिक विधाते, बाळासाहेब भुजबळ, विनोद पुंड, वीरशैव लिंगायत गवळी समाज अहिल्यानगर चे नगरसेवक प्रकाश भागानगरे, सटवाजी आप्पा गेणाप्पा, पै.सतीश हरबा,विष्णूशेठ कलागते, चंद्रकांत औशीकर, आप्पासाहेब बारसे, शंकरराव पंगूडवाले, हरिभाऊ हिरणवाळे,लंकेश हरबा, बाळासाहेब मिसाळ, दत्तात्रय नागापुरे,मोहन हिरणवाळे,राहुल हरबा,राजू घुगरे,अनिल हरबा,सचिन बहिरवाडे,नंदू भाऊ भागानगरे, जगन्नाथ बहिरवाडे, संभाजी नामदे,नवनाथ खंडेराव उमेश दहींडे,अरुण औशीकर, सागर हरबा,विशाल भागानगरे, बंडू लंगोटे,सोमनाथ शहापूरकर आदी उपस्थित होते.

यावेळी प्रा.माणिक विधाते म्हणाले,महात्मा फुले व सावित्रीआई फुले यांच्या स्मारकासाठी जागा अपुरी पडत असल्याने माळीवाडा वेस पाडण्यात यावी हा ठराव फुले दांपत्य स्मारक समितीने केला आहे. स्मारक पाचही रस्त्यावरून दिसावे. तसेच परिसरातील अतिक्रमणे काढण्यात यावी.रखडलेले स्मारकाचे काम ताबडतोब सुरू करावे या मागणीसाठी महानगरपालिकेत निवेदन देण्यात आले आहे.

या मागणीला नगरसेवकांनी मोठा पाठिंबा दिला आहे.तसेच शहरातील गणेश मंडळे व अनेक समाजाचा पाठिंबा मिळत असल्याने महात्मा फुले अनुयायांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. शहरातील गवळी समाजाने मोठा पाठिंबा दिला आहे.यावेळी अनिल हरबा यांनी आभार मानले.

# विकासासोबत शाळेमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन

ओतूर : (स. गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील ओतूर येथील श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ संचालित विलास तांबे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, डुंबरवाडी यांच्यावतीने शुक्रवार ता. ३ एप्रिल २०२६ रोजी गुड फ्रायडे निमित्ताने आळेफाटा येथील जे. आर. गुंजाळ इंग्लिश मीडियम स्कूल येथे विविध शाळाबाह्य उपक्रमांचे आयोजन केले होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व स्वागत समारंभाने झाली. प्रमुख उपस्थित मान्यवरांमध्ये श्री ज्ञानेश्वर महाराज देवस्थान ट्रस्टचे सेक्रेटरी जीवन शिंदे, पंचायत समिती सदस्या सपना शिंदे, अमृता गडगे, डॉ. प्रदीप गुंजाळ, ऋषिकेश





खर्डे, प्राचार्य जितेंद्रकुमार हांडे, विठ्ठल म्हस्के, संदीप सोळंकी, विलास तांबे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय देवकर यांची विशेष उपस्थिती होती. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी साहित्यांचे वाटप करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी विविध वृक्षांची बीज वाटप करण्यात आली. स्वर्गीय मीनाताई गुंजाळ यांच्या स्मरणार्थ "ज्ञानविलास" या नावाने विद्यार्थ्यांसाठी वाचनालय सुरू करण्यात आले. तसेच पर्यावरण जागृतीअंतर्गत "पाण्याचा एक थेंब अमृत"या पोस्टरचे प्रकाशन करून जलसंवर्धनाचा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी संतुलित आहार संबंधी पोस्टर प्रदर्शन भरविण्यात आले. तसेच प्रा. उमा काळे यांनी 'मनन-चिंतन' सत्र घेऊन विद्यार्थ्यांना सकारात्मक विचारांची दिशा देण्यात आली. डॉ. संजय देवकर यांनी जादूचे प्रयोग सादर करून विद्यार्थ्यांचे मनोरंजन व त्यामागे असणारे वैज्ञानिक कारण विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. बी. एड. महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी सामाजिक विषयांवर आधारित प्रभावी पथनाट्य सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधले. प्रा. नीलम शिवणे यांनी 'वयात येताना मुली व आरोग्य काळजी 'या विषयावर शाळेतील विद्यार्थिनींना मार्गदर्शनपर व्याख्यान दिले. जयहिंद कॉलेज ऑफ नर्सिंग यांच्यावतीने आरोग्य तपासणी करून सॅनिटरी पॅडचे वाटप केले.

उपक्रमांसाठी लागणारे साहित्य बी.एड. मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी स्वतः पुढाकार घेऊन जमा केले होते. महाविद्यालयाच्या या उपक्रमाला बी .एड. मधील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळून मोठ्या प्रमाणात साहित्य संकलन झाले. यावेळी बी.एड. छात्र अध्यापकांनी आपल्या मनोगतात सांगितले की "या उपक्रमामुळे आम्हाला शिक्षण, आरोग्य आणि पर्यावरणाबद्दल महत्त्वपूर्ण माहिती मिळाली. तसेच सामाजिक जबाबदारीची जाणीव झाली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय देवकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी अशा शाळाबाह्य उपक्रमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षणासोबत समाजाभिमुख दृष्टिकोन विकसित होणे आवश्यक आहे."

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.

पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे

पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)